**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव –** समीर महादेव शिवगंड.

**वय** - २६ वर्ष, **व्यवसाय** - खाजगी नोकरी,

**राहणार.-** भादवण, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरकार पक्षातर्फे सरतपास– श्रीमती. एस. ए. म्हामूलकर, सरकारी वकील.**

**१.** दि.०६.०८.२०१९ रोजी मी, सुशांत, आदित्य आणि आरोपी रोहित असे त्याच्या लाल रंगाच्या ब्रीझा गाडी क्र. ०४८५ ने गडहिंग्लजला जात होतो. त्यावेळी आरोपी गाडी चालवत होता. मी त्यावेळी आरोपीच्या बाजूला बसलेलो होतो. आमच्या गाडीचा आर्दाळ येथे टायर फुटल्यामुळे तिच्यावरचे नियंत्रण सुटले होते. आमची गाडी एका दुचाकीला धडकली होती. त्या गाडीचालकाला मार लागून तो मयत झाला होता. त्यामध्ये मला व सुशांतला किरकोळ मार लागला होता. आमच्या वरती सरकारी दवाखान्यात उपचार झाले होते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**२.** सदर अपघात झाल्यानंतर आम्ही सर्वजण पोलिस ठाण्यात गेलो होतो. मला पुढे काय झाले याबाबत माहिती नाही. पोलिसांनी माझ्याकडे अपघाताबाबत चौकशी केली होती. त्यावेळी आम्हाला आरोपी लोक मारतील असे सांगून तो तेथून निघून गेला होता. मी, सुशांत व आदित्य घटनास्थळी थांबलो होतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाही.
**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे उलटतपास – श्री. आर. आय. पालकर वकील.**

**३.** आम्ही घटनेच्या दिवशी ११.३० ते १२.०० वाजेच्या दरम्यान गडहिंग्लजकडे निघालो होतो. त्यावेळी भरपूर पाऊस पडलेला असल्यामुळे नदी–नाले भरलेले होते. आजरा– कोल्हापूर हा वाहतुकीचा मुख्य रस्ता आहे. आम्ही जात असताना बरीच वाहने रस्त्याने येत–जात होती. मला समोरुन आलेल्या मोटारसायकल वरती किती लोक बसलेले होते याबाबत सांगता येणार नाही.

**४.** घटनेच्या वेळी पाऊस पडत असल्यामुळे आमच्या गाडीचे वायपर चालू होते. आमच्या गाडीचा टायर फुटल्यानंतर ती रस्त्याच्या बाजूला गेली होती. गाडीचा टायर

फुटल्यामुळे सदर अपघातात गाडी चालकाची चूक नाही. मला घटनास्थळी जमलेल्या लोकांची नावे सांगता येणार नाही. आम्ही जखमीला उचलत असताना गर्दीतील एका व्यक्तीने मला धक्काबुक्की केली होती. त्यानंतर देखील आम्ही जखमीला गाडीत बसवून दवाखान्यात पाठवून दिले होते.

**५**. समोरुन आलेला मोटारसायकल चालक जोरात गाडी चालवत होता. तो आमच्या गाडीला धडकल्यानंतर रस्त्याकडील गटारामध्ये जाऊन पडला होता.

**उलटतपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २१.०४.२०२५. **(आर. पी. थोरे)**

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ७.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव –** श्रीधर भागवतराव जगताप.

**वय -** ३९ वर्ष, **व्यवसाय -** सहाय्यक पोलिस निरीक्षक,

**नेमणूक.-** रामतीर्थ पोलिस ठाणे, ता. बिलोली, जि. नांदेड.

**सरकार पक्षातर्फे सरतपास– श्रीमती. एस. ए. म्हामूलकर, सरकारी वकील.**

**१.** मी जुलै २०१८ ते ऑगस्ट २०१९ पर्यंत आजरा पोलिस ठाण्यात पोलिस उपनिरीक्षक पदावरती कार्यरत होतो. दि.०६.०८.२०१९ रोजी दाखल झालेल्या सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास सहाय्यक फौजदार दोरुगडे यांनी केल्यानंतर पुढील तपास माझ्याकडे देण्यात आला होता. मला तपासकामी एफ.आय.आर., पंचनामा, तपास टिपण, आरोपीला दिलेली मो. वा. का. कलम २०९ ची नोटीस इ. प्राप्त झाले होते.

**२.** मी पुढील तपासकामी अपघातातील मयताचे वैद्यकीय प्रमाणपत्र आणि शवविच्छेदन अहवाल मिळण्याबाबत पत्र दिले होते. आता मला ते पत्र दाखवले, त्यावरती माझी स्वाक्षरी आहे. तिला **नि. क्र. पी–२८** देण्यात येतो. त्यानंतर मी मा. जिल्हा न्यायालय, गडहिंग्लज येथे अपघाताचा डार अहवाल सादर केला होता. आता मला तो अहवाल दाखवला, त्याला **नि. क्र. पी.– २९** देण्यात येतो. मला तपासाअंती आरोपीने विनापरवाना स्वतःची गाडी भरधाव वेगाने चालवून अपघात करुन जखमीला वैद्यकीय मदत न पुरवता तसेच पोलिसांना माहिती न देता घटनास्थळावरुन पळून गेल्याचे निष्पन्न झाल्यामुळे दोषारोपपत्र दाखल केले आहे. आरोपी आज न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे उलटतपास – श्री. आर. आय. पालकर वकील.**

**३.** दोरुगडे यांनी दि.०६ ते १५ दरम्यान सदर गुन्हयाचा तपास केला होता. मला तपास मिळण्यापूर्वी घटना घडल्याची माहिती होती. मला सदर गुन्हा वरिष्ठांच्या तोंडी आदेशाने तपासकामी देण्यात आला होता. मला त्याबाबत लेखी आदेश दिला नव्हता. माझ्याकडे तपास आल्यानंतर मी घटनास्थळी गेलो होतो. सदरचा अपघात गुरव यांच्या शेताजवळ, उत्तूर– आजरा रस्त्यावर घडला होता. मला त्यांच्या शेताचा गट क्रमांक सांगता येणार नाही. घटनास्थळाच्या पुर्वेला यमगेकरांचे शेत, पश्चिमेला तानाजी गुरव यांची जमीन

आणि उत्तर-दक्षिण आजरा-उत्तूर असा रस्ता आहे.

४. डार अहवालामध्ये गाडीमध्ये बिघाड असल्याचा निष्कर्ष दिलेला नाही. मी तपास मिळाल्यानंतर अपघातातील गाडी पाहिली होती. त्या गाडीचा उजव्या बाजूचा टायर फुटलेला होता. मी सदर अपघाता दरम्यान गाडीत असणा-या लोकांचे जबाब नोंदवले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी दोरुगडे यांनी केलेल्या प्राथमिक तपासाच्या आधारे आज साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर गुन्हयाचा पुढील तपास केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २१.०४.२०२५.

आजरा.

**(आर. पी. थोरे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA